दिनांक 27/01/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.133

विषय – नगपरिषदांना विशेष रस्ता अनुदान योजनेअंतर्गत प्राप्त निधीतून करावयाच्या कामांना मंजूरी देणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 25/01/2023 ने नगरअभियंता व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

नगर विकास विभागाकडील,शा.नि.नपवै 2022/प्र.क्र.211-38/नवि-16 मुंबई 32 दि.06/12/2022 अन्वये विटा नगरपरिषद ता.खानापूर जि.सांगली यांना रस्ता व तदअनुषंगिक बाबींचा विकास करण्याच्या कामांना विशेष रस्ता अनुदान म्हणून विटा नगपरिषद येथील प्रभाग क्रं.1 ते 12 मधील अंतर्गत रस्ते सुधारणा करणे व गटर काम करणे या कामांना सन 2022-2023 या अर्थिक वर्षाकरीता र.रू.7.18 कोटी इतका निधी मंजूर झालेला असून सदर शासन निर्णयानुसार कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग राहील असे सुचित केले आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचेकडील पत्र जा.क्रं.146/2022 दि.14/12/2022 अन्वये प्रस्तावित कामांना लागणा-या कागदपत्रांची मागणी केलेली आहे.

| अ.नं | कामांची नावे | रक्कम रूपये (लक्ष) |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र. १ मधील आयटीआय समोरुन मायणी रोडला जाणारा उर्वरित रस्ता करणे व श्रीराम मसाले ते फासे घर गटार करणे. | 70.00 |
| 2. | प्रभाग क्र. २ मधील साळशिंगे रोड ते जमीर आत्तार घर रस्ता कॉंक्रिटीकरण व गटार करणे. | 15.00 |
| 3. | प्रभाग क्र. २ मधील लेंगरे रोडवरील दत्तनगर बोर्ड ते लाटणे घर रस्ता व पाईप गटार करणे. | 20.00 |
| 4. | प्रभाग क्र. ३ मधील बटी आडके चौक ते मंडले वस्तीकडे जाणारा रस्ता करणे व जुना वासुंबे रोड वासुदेव चोथे ते कुमार लोटके घर RCC गटार बांधणे. | 55.00 |

| | | |
|---|---|---|
| 5. | प्रभाग क्र. ५ मधील जगन्नाथ तात्या बोर्ड ते ओढयाकडे रस्त्याच्या डाव्या बाजुने गटार करणे. | 20.00 |
| 6. | प्रभाग क्र. ७ मधील भवानीमाळ शिवाजी बाबर घर ते विश्वजीत मोरे घर रस्ता व गटार करणे. | 50.00 |
| 7. | प्रभाग क्र. ७ मधील विटा मर्चंट बँकेपाठीमागे दत्तात्रय देवकते ते राजलक्ष्मी अपार्टमेंट पर्यंत एक बाजूने गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे व तुषार मेहता घर ते माहेर हॉस्पिटल उर्वरित लांबीत रस्ता व गटार करणे. | 15.00 |
| 8. | प्रभाग क्र. ८ मधील कराड रोड गुळवणी पोल्ट्री ते विश्वनाथ गायकवाड घरापर्यंत रस्ता करणे. | 60.00 |
| 9. | प्रभाग क्र. ८ मधील नेवरी रोड रावताळे घर ते अरुण गायकवाड घरापर्यंत रस्ता करणे. | 20.00 |
| 10. | विवेकानंदनगर येथील कराड रोड ते ढवळेश्वर तलावाकडे जाणारा रस्ता व गटार करणे, | 150.00 |
| 11. | प्रभाग क्र. ८ मधील विजय पवार घर ते अर्जुन सावंत घर रस्ता करणे. | 10.00 |
| 12. | प्रभाग क्र. ८ मधील नेवरी रोड विश्वास शिंदे घर ते शाहू उद्यान पर्यंत रस्ता व गटार करणे. | 25.00 |
| 13. | प्रभाग क्र. ८ मधील नेवरी रोडवरील शशिन पवार घर ते वनमोरे घर पर्यंत रस्ता करणे. | 17.00 |
| 14. | प्रभाग क्र. ८ मधील शाहूनगर येथील पवार मॅडम घर ते जगताप घर रस्ता व गटार करणे. | |
| 15. | प्रभाग क्र. ८ मधील नेवरी रोड ते चंद्रकांत पवार घर रस्ता करणे. | 20.00 |
| 16. | प्रभाग क्र. ८ मधील काळे घर ते चंद्रकांत शितोळे घर रस्ता करणे. | 14.00 |
| 17. | प्रभाग क्र. ८ मधील शाहुनगर शितोळे घर ते डॉ. भिसे यांचे घरापर्यंत रस्ता करणे. | |

| | | |
|---|---|---|
| 18. | प्रभाग क्र. ८ मधील नेवरी रोड ते सुतारकीकडे जाणारा रस्ता व लक्ष्मी पवार घर ते लवटे घर रस्ता करणे. | 10.00 |
| 19. | प्रभाग क्र. ९ मधील हिरवळ वाडा ते भोसले घर रस्ता व गटार करणे. | 15.00 |
| 20. | प्रभाग क्र. ९ मधील आनंद क्लॉथ व कल्लेश्वर मंदीर परिसर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | 17.00 |
| 21. | प्रभाग क्र. १० मधील सोनार गल्ली बोरवेल ते अवधुत महाजन घर व परिट वाडा परिसर लादीकरण करणे. | |
| 22. | प्रभाग क्र. १० मधील सतिश चव्हाण घर ते मारडकर घर व पंढरीतल्या रस्त्यापर्यंत आर.सी.सी. रस्ता करणे व दिंडीचे बोळ शितोळे गल्ली भुयारी गटार करणे. | 15.00 |
| 23. | प्रभाग क्र. ११ मधील कुंडल रोड ते शिंदे वस्तीकडे जाणारा रस्ता करणे. | 15.00 |
| 24. | प्रभाग क्र. १२ मधील गांधीनगर येथील कन्हैय्या पवार घर ते लालासो पवार विहीर रस्ता करणे, सी.डी. वर्क बांधणे, गटारसह संरक्षक भिंत बांधणे. | 70.00 |
| 25. | प्रभाग क्र. १२ मधील तासगांव रोड ते नाथ पावक्ता मंदीर रस्ता करणे. | 15.00 |

वरील नमूद कामांपैकी ज्या रस्त्यांची कब्जेपट्टी नगपरिषद दफ्तरी नसतील त्या रस्त्यांची कब्जेपट्टी करून घेणेकामी संबंधित जागा मालकांकडून आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून घेणेत यावी.त्यानंतर जागा मालकी/ ताब्यात असलेबाबतचे प्रमाणपत्र देणेत येईल.तसेच वरील कामे ही दुरूस्ती अथवा परिरक्षणाची कामे नाहीत. सदर कामांना अन्य कोणत्याही योजनेतून प्रस्तावित अर्थसहाय्य प्राप्त झालेले नाही. सदरच्या कामामुळे विटा शहरातील प्राथमिक सोई सुविधामध्ये भर पडणार असून वरीलपैकी कोणतेही काम हे खाजगी स्वरूपाची नाहीत. विटा नगपरिषदेसाठी मलनिस्सारण प्रकल्प मंजूर नाही व पाणी पुरवठा प्रकल्पामुळे वरील कोणतेही कामे वंचित होत नाहीत.वरील सर्व कामांना प्रशासकीय मान्यतेपेक्षा ज्यादा खर्च होणार नाही याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभागाने घेणेची आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन तसेच रस्त्यांची कब्जेपट्टी करून घेऊन उपरोक्त सर्व कामांची दुरूस्ती देखभाल व परिरक्षण हमीपत्र देणेत यावे. तसेच याकामी होणा-या सर्व कार्यवाहीस व ठरावास प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 27/01/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 134

विषय – महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद व महाबळेश्वर नगरपरिषद कर्मचारी वेलफेअर क्लब महाबळेश्वर जि.सातारा यांनी आयोजीत केलेल्या क्रिकेट व कब्बडी स्पर्धेसाठी सहभाग नोंदविलेल्या विटा नगरपरिषदेकडील खेळाडूंना गणवेश किट व साहित्य खरेदी बाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 25 /01 /2023 ने सहा.भांडार पर्यवेक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद व महाबळेश्वर नगरपरिषद कर्मचारी वेलफेअर क्लब महाबळेश्वर जि.सातारा यांनी आयोजीत केलेल्या सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे व कोकण विभागातील सर्व नगरपरिषद कर्मचा-यांसाठी दि.11/02/2023 व दि.12/02/2023 रोजी क्रिकेट व कब्बडी स्पर्धेचे आयोजन करणेत आलेले आहे. सदर स्पर्धेसाठी विटा नगरपरिषदेमार्फत संघ नोंदणी दाखल करणे बाबत मा.मुख्याधिकारी यांनी मंजूरी दिलेली आहे. या स्पर्धेसाठी नगरपरिषदेमार्फत 35 खेळाडू स्पर्धेसाठी पाठविणेत येणार आहेत. यातील सहभागी खेळाडूंना (ट्रॅक सुट, शॉर्ट, टि शर्ट) तसेच (2 बॅट, 12 बॉल, 6 स्टम्प, 2 गार्ड) इत्यादी साहित्य नगरपरिषदेच्या नावासह पुरविणेचे आहे. तरी सदर साहित्य खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 27/01/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.135

विषय – विटा शहर मंजूर (दु.सु.) विकास योजना रि.स.नं. 809 मधील आरक्षण क्रं.47(इ.पी.क्रं.23) बगीचा आरक्षणाचा गौण फेरफार मंजूर करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 25 /01 /2023 ने सहा.नगररचनाकार व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा शहर विकास योजनेतील रि.स.नं. 809 मधील बगीचा आरक्षण क्रं. 47 वगळणेबाबतचे श्री.सदाशिव भिमराव सपकाळ यांचे अर्जावर प्रशासकीय ठराव क्रं.51 दिनांक 03/10/2022 ने रि.स.नं. 809 मधील बगीचा आरक्षण क्रं. 47 वगळणेबाबत मंजूरी देणेत आली आहे. याकामी नगरपरिषदेने दैनिक तरूण भारत दिनांक 05/10/2022 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र 13/10/ 2022 मध्ये प्रसिध्दी देवून याबाबत नागरिकांकडून सूचना/ हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार विहित मुदतीत दोन सुचना/ हरकती प्राप्त झाल्या होत्या. नगरपरिषदेने दि.12/12/2022 रोजी सदर हरकतीवर सुनावणी घेतली असता प्रत्यक्ष हरकतदार हे सुनावणीस उपस्थित न राहता पुनश्च तोच अर्ज सादर केलेने नगरपरिषदेने सदर अर्जावर नियमोचित कार्यवाही करुन दि.19/01/2023 रोजी सदर अर्ज निकाली काढणेत आले. विटा शहर मंजूर विकास योजना (दुसरी सुधारीत) विकास योजना पुस्तिकेनुसार नियोजन विभाग क्रं..3 मध्ये बगीचासाठी 1.98 हे.इतके क्षेत्र आरक्षीत ठेवणेबाबत नमुद केले असून नियोजन विभाग क्रं.3 मध्ये आ.क्रं.47, आ.क्रं.116 व आ.क्रं.119 असे मिळून 5.42 हे.इतके क्षेत्र बगीचासाठी आरक्षीत आहे.आ.क्रं.47(ई.पी.क्रं.23) बगीचा हे आरक्षणाचे क्षेत्र वगळून 4.87 हे.इतके क्षेत्र बगीचासाठी आरक्षीत राहत आहे.जे विकास योजना पुस्तिकेत नमूद केलेल्या आवश्यक क्षेत्रापेक्षा अधिक आहे.असे दिसून येते.अर्जदार यांचे मागणी प्रमाणे गौण फेरफारास अंतिम ठराव करून मंजूरीसाठी पाठविणेत हरकत नाही. त्यामुळे विटा शहर मंजूर (दु.सु.) विकास योजनेतील रि.स.नं. 809 मधील आरक्षण क्रं. 47 बगीचा (इ.पी.क्रं.23) गौण फेरफार करणेस अंतिम मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा